CNRMHAH1900 1707 2015

**रे मु नं. ४६६/२०१५ मध्ये नि. ६२ वर आदेश**
( शंकर कुंडलीक बोडखे वि. आसाराम नामदेव लाड )

वादीने अर्जात असे कथन केले आहे की, वादीतर्फे या न्यायालयाच्या हुकूमाप्रमाणे नि.६० प्रमाणे दुरुस्ती करुन घेणे गरजेचे होते. परंतु नजरचूकीने दुरुस्ती करुन घेण्याचे राहून गेले. आज रोजी वादीस सदरची दुरुस्ती नि.क्र. ६० वरील आदेशाप्रमाणे करुन घेण्याची परवानगी मिळण्याची विनंती केली.

२. प्रतिवादीने सदर अर्जास म्हणणे देउन हरकत घेतली व कथन केले की सदर दाव्यामध्ये वादीने दुरुस्तीचा अर्ज दि. ०४/८/२०२३ रोजी दिला असून सदरचा अर्ज दि. २३/०१/२०२४ रोजी मंजूर झालेला आहे. परंतु वादीने सदर आदेशानुसार वीस महिन्यापूक्षा जास्त कालावधीपर्यंत दुरुस्ती केली नाही. सदरचा अर्ज केवळ प्रतिवादींना त्रास देण्यासाठी दाखल केलेला आहे. सबब अर्ज नामंजूर करण्याची विनंती केली व मंजूर केल्यास रु. ५०००/– खर्च लादण्याची विनंती केली.

३. दोन्ही बाजूंचे युक्तीवाद ऐकले.

४. वादीने अर्जात मागितलेली विनंती ही पूर्वीच्या वारस रेकॉर्डवर घेण्याच अर्जासंदर्भात आहे. सदर दुरुस्ती फॉर्मल स्वरुपाची असल्याचे दिसून येते. सदर अर्ज मंजूर झाल्यास दाव्याचे स्वरुप बदलणार नाही. दाव्याच्या संबंधित सर्व आवश्यक बाबी दाव्यामध्ये समाविष्ट असल्यास दाव्यामध्ये गुंतागुंत निर्माण होणार नाही. याउलट दाव्याचा गुणदोषावर निकाल देण्यासाठी त्याची मदतच होणार आहे. वरील विवेचनाच्या अनुषंगाने वादीचा सदरचा अर्ज मंजूर करणे

मला न्यायोचित वाटते. परंतु सदरचा अर्ज हा नि. ६० वरील अर्ज मंजूर झाल्यापासून उशीराने दिलेला आहे. त्यामूळे सदरचा अर्ज वादीने प्रतिवादीला खर्च देण्याच्या अटीवर मंजूर करणे न्यायोचित होईल. सबब मी खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

**<u>आदेश</u>**

१. सदर अर्ज वादीवर रक्कम रु.३००/- (अक्षरी रु. तीनशे मात्र) खर्चाची आकारणी करुन मंजुर करण्यात येतो.

२. खर्चाची रक्कम वादीने प्रतिवादीला अदा केल्यानंतर वादीने नि.क्र. ६० वरील आदेशाप्रमाणे दुरुस्ती पुढील तारखेपर्यंत करावी.

RAMESH RAOJI BHADRE
Digitally signed by RAMESH RAOJI BHADRE
Date: 2026.01.05 17:33:02 +0530

दि. ०५/०१/२०२६ (आर. आर. भद्र)
शेवगाव. दिवाणी न्यायाधीश क. स्तर
शेवगाव